लातूर
# भूकंप
LATUR BHUKAMP

सांज दैनिक : शुक्रवार - १८ जुलै २०२५
वर्ष - ३९ वे
अंक - १०६
पाने - ४
किंमत २ रूपये
E-Mail : dailybhukamp@gmail.com
RNI No. MAHMAR/2012/42770
☎ :-9422072823,251822
संपादक: अशोक चिंचोले
http://dainikbhukamp.com




# लातूरात अतिक्रमण हटाव 'पुढचं पाठ मागचं सपाट'

लातूर :- लातूर शहर महानगरपालिकेच्या अतिक्रमण हटाव विभागाने लातूर शहरातील फुटपाथवरील अतिक्रमण हटाव मोहीम हाती घेतली आहे. २३ जून पासून ही मोहीम सुरू आहे. मात्र ही मोहीम म्हणजे 'पुढचं पाठ, मागचं सपाट' अशी झाली आहे. लातूर शहरातील जवळपास सर्व रस्त्यांवर अतिक्रमणे झाली आहेत, नागरिकांना शहरातून चालण्यासाठी फुटपाथ नावाचा प्रकारच उरला नाही. याबाबत अनेक तक्रारी आल्यानंतर लातूर शहर महानगरपालिकेकडून २३ जून पासून लातूर शहरातील छोट्या व मोठ्या रस्त्यावरील दोन्ही बाजूला असलेल्या फुटपाथवरील अतिक्रमणे हटविण्याची मोहीम जोरात राबविण्यात येत आहे. आजही ही मोहीम चालूच आहे. २३ जून रोजी लातूर शहरातील महात्मा गांधी चौकापासून फुटपाथवरील अतिक्रमण हटाव मोहीम हाती घेण्यात आली. आज खाडगाव रोड परिसरातील



अतिक्रमण हटविणे चालू आहे. अतिक्रमण हटविण्यासंदर्भात नागरिकांतून स्वागत करण्यात येत आहे, मात्र महिना झाला तरी अतिक्रमण हटविणे आणखी चालूच आहे. अशा ठिकाणी अतिक्रमण हटविल्याच्या दुसऱ्या दिवशीपासून 'जैसे थे' परिस्थिती दिसून येत आहे म्हणजे हा प्रकार 'पुढच पाठ, माग सपाट' असा निदर्शनास येत आहे. फूटपाथवर छोटी मोठी व्यवसाय करणारे व्यापारी फेरीवाले यांना या अतिक्रमण हटवण्याचा मोठा फटका बसला आहे तसेच रस्त्याच्या शेजारी असलेल्या दुकान मालकांनीच पुढे आपली साहित्य ठेवून अतिक्रमण केले होते. हे अतिक्रमण, अतिक्रमण विरोधी पथकाने जेसीबी लावून काढले खरे मात्र, ही स्थिती कायम राहत नाही. ठराविक दिवसांनी पुन्हा जशास तसे अतिक्रमण होते आहे. पर्यायाने लातूरकरांना चालण्यासाठी फुटपाथ हे उपलब्ध होत नाहीत. लातूर महानगरपालिकेच्या प्रशासनाने यासंदर्भात काहीतरी उपाय योजने आवश्यक आहे. दरवर्षी किंवा ठराविक वेळी अशा पद्धतीने अतिक्रमण हटवायचे आणि पुन्हा जशास तशी परिस्थिती निर्माण व्हायची असेल तर हा म्हणजे छोट्या व्यापारी, टपरी धारकांना विनाकारण त्रास देण्याचा प्रकार आहे.

एखाद्या अतिक्रमण असलेल्या ठिकाणी पुन्हा अतिक्रमण होणार नाही यासाठी महानगरपालिकेने कायमचा बंदोबस्त केला पाहिजे किंवा तशा पद्धतीची एखादी पद्धती निर्माण केली पाहिजे. जेणेकरून कोणात्याही ठिकाणी अतिक्रमण होणार नाही. अन्यथा सध्या जो अतिक्रमण हटवण्याचा प्रकार चालू आहे तो प्रकार म्हणजे 'पुढचं पाठ, मागच सपाट' असं ठरत आहे. यातून विनाकारण प्रशासकीय यंत्रणेचा मोठा वेळ वाया जात आहे तर छोटे व्यापारी तसेच फेरीवाले यांचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे. महापालिका प्रशासनाने तात्काळ यावर उपयोजना करावी अन्यथा अतिक्रमण हटवणे बंद करावे अशीही चर्चा नागरिकांतून करण्यात येत आहे.



फोटो-प्रकाश कंकाळ

## पाऊस नाही सोयाबीनवर रोटर फिरविले

लातूरः- लातूर जिल्ह्यामध्ये बहुतांश भागामध्ये परेणी केल्यापासून पाऊसच नाही. त्यामुळे पिके उगविले नाहीत. त्याची योग्य वाढ झाले नाही याचा उत्पन्नावर परिणाम होणार या भितीपोटी शेतकऱ्यांकडून आता सोयाबीनवर रोटर फिरविण्यात येत आहे.

लातूर जिल्ह्यातील शिराळा गावामध्ये ब्रह्म नक्षत्रात सोयाबीनची पेरणी केली मात्र पेरणीपासून पाऊसच झाला नसल्याने सोयाबीनचे पीक उगविलेच नाही. त्यामुळे या शिवारातील कांही शेतकऱ्यांनी सोयाबीन पिकावर अक्षरशा सोयाबीनवर रोटर फिरविले जात आहे. अशा शेतकऱ्यावर पुन्हा दुपार पेरणीची वेळ येणार आहे.

# औसा बसस्थानक राज्यात दुसरे

औसा :-गेल्या सहा वर्षांपासून आ. अभिमन्यू पवार औसा मतदारसंघात विकासाची गंगा आणत आहेत. अनेक विकासाच्या योजना औसा विधानसभा मतदारसंघात राबवित विकासाचा बॅकलॉग भरून काढण्याचा त्यांचा प्रयत्न नक्कीच प्रशंसनीय आहे. पुढील २५ वर्षांचे व्हिजन ठेवत मतदारसंघात अनेक विकासकामे केली जात आहेत. त्यात आरोग्य, रस्ते, नागरी सुविधा, अनेक शासकीय कार्यालय त्याचबरोबर ग्रामीण भागातील पाणंद रस्ते याचा समावेश आहे. मतदारसंघातील वाहतूक व्यवस्था सुरळीत व्हावी या उद्देशाने औसा शहरात नवीन बसस्थानकाची उभारणी करण्यात आली. या नवीन बसस्थानकाची रचना व आखणी योग्य केल्याने औसेकरांची समस्या मोठ्या प्रमाणात दूर झाली आहे. नुसत्या इमारती न बांधता त्या इमारतीची



काळजी घेणे क्रमप्राप्त आहे. या अनुषंगाने महाराष्ट्र परिवहन महामंडळाच्या औसा डेपोने बसस्थानक स्वच्छ व सुंदर ठेऊन राज्यासमोर आदर्श निमाण केला, त्यामुळेच औसा बसस्थानकाला हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ, सुंदर बसस्थानक अभियानांतर्गत राज्यात करण्यात आलेल्या सर्वेक्षणात, अ वर्गवारीतील आपले औसा बसस्थानक मराठवाड्यातील पहिले आणि राज्यातील दूसरे सर्वात स्वच्छ व सुंदर बसस्थानक ठरले आहे. त्यामुळे निश्रि्चतच औसेकरांसहीत आ. अभिमन्यू पवार यांची मान उंचावली आहे.

हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ, सुंदर बसस्थानक अभियानांतर्गत राज्यात करण्यात आलेल्या सर्वेक्षणात, अ वर्गवारीतील औसा बसस्थानक मराठवाड्यातील पहिले आणि राज्यातील दुसरे सर्वात स्वच्छ व सुंदर बसस्थानक ठरले आहे. यासोबतच लामजना बसस्थानक क वर्गवारीतील बसस्थानकांमध्ये मराठवाड्यातील तिसरे सर्वात स्वच्छ व सुंदर बसस्थानक ठरले आहे. सातत्यपूर्ण पाठपुरावा करून औसा, लामजना आणि कासार सिरसी येथे बसस्थानक बांधकामासाठी निधी मंजूर करून आणला, सर्व प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करून, बांधकाम पूर्ण करून तिन्ही बसस्थानके कार्यान्वित केली. ही बसस्थानके औसेकरांना दर्जेदार सेवा देण्यासोबतच स्वच्छतेच्या बाबतीतही अव्वल ठरली आहेत. बारामतीनंतर औसा बसस्थानक राज्यातील दूसरे सर्वात स्वछ आणि सुंदर बसस्थानक ठरले आहेत. महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळातील औसा डेपोतील व्यवस्थापक व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन आ. अभिमन्यू पवार यांनी केले आहे. यांनी केलेल्या कामामुळेच आपल्याला पारितोषिक मिळाले असून त्यांच्यामुळे औसेकरांची मान राज्यात उंचावली आहे.

# पडळकर-आव्हाड यांना खेद व्यक्त करण्याचे आदेश

मुंबईः- विधानभवनात काल आ. जितेंद्र आव्हाड, आ. गोपीचंद पडवळकर यांच्या समर्थांकमध्ये तुफान राडा झाला होता. हे प्रकरण विधानसभा अध्यक्षांनी गांर्भीयाने घेतले असून याप्रकरणी दोन्ही आमदारांनी खेद व्यक्त करावा अशा सुचना दिल्या आहेत. तर सर्जेराव टकले, व नितीन देशमुख या कार्यकर्त्यांवर फौजदारी दाखल करण्याचे आदेश विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी दिली आहेत.

१७ जुलै २०२५ रोजी सभागृहात अंतिम आठवडा प्रस्तावावर चर्चा सुरु असताना काही सन्माननीय सदस्यांनी माझ्या निदर्शनास आणले आहे की, विधानभवन इमारतीच्या प्रवेशद्वारावार मेन पोर्च येथे दोन अभ्यागतांमध्ये मारामारी झाली आहे. याबाबत विविध प्रसारमाध्यमांवर बातम्या प्रसिद्ध करण्यात आल्या. विधानमंडळाचे सदस्य यांच्याबाबत टीकाटिप्पणी करण्यात आली आहे. ही बाब गंभीर स्वरुपाची असून सभागृहाच्या प्रसिमेमध्ये घडली आहे. याबाबत मी विधिमंडळाचे मुख्य सुरक्षा अधिकारी यांना तात्काळ या घटनेचा अहवाल



सादर करण्याचे आदेश दिले. या अहवालातून दिसून येते की, १७ जुलै रोजी संध्याकाळी ५ वाजून ४५ मिनिटांनी मेन पोर्चमध्ये अचानक दोन अभ्यागतांमध्ये मारामारी सुरु झाली. ही मारामारी सुरक्षा पथकाने तात्काळ थांबवली. नमूद इसमांना ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्यापैकी नितीन हिंदुराव देशमुख ( वय ४१) याने जितेंद्र आव्हाडांचा कार्यकर्ता असल्याचे सांगितले. तर दुसरा इसम सर्जेराव बबन टकले (वय ३७) याने गोपीचंद पडळकरांचा यांचा मावसभाऊ असल्याचे सांगितले.

याबाबत संबंधितांविरोधात आणि त्यांच्यासोबतच्या सहा ते सात जणांविरोधात मरिनड्राईव्ह पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यांच्यावर फौजदारी कारवाई करण्यात येत आहे. कोणत्याही प्रकारची परवानगी नसताना व अधिकृत प्रवेशिका नसताना अनधिकृतपणे हे अभ्यागत विधानभवनाच्या आवारात आले. त्यांनी मारामारी करुन आक्षेपार्ह कृत्य केल्याच दिसून येते. विधानमंडळाच्या प्रसिमेममध्ये अशी घटना यापूर्वी कधीही झालेली नाही. सदस्यांनी विधानमंडळात येताना कोणत्याही अनाहूत व्यक्ती व अभ्यंगत यांना विधिमंडळाच्या परिसरात आणण्याची कोणतीही आवश्यकता आहे, असे मला वाटत नाही. तसेच अभ्यांगत कोणत्याही कारणामुळे विधानभवनात आले तर त्यांच्या वर्तणुकीची जबाबदारी संबंधित सदस्याने घेणे आवश्यक आहे. कोणत्याही अभ्यांगताच्या आक्षेपार्ह वर्तणुकीसाठी सदस्यांवर जबाबदारी निश्रि्चत करणे गरजेचे आहे. या अप्रिय घटनेच्या अनुषंगाने मी सर्व सदस्यांच्या निदर्शनास आणत आहे की, विधिमंडळाचे सदस्य म्हणून आपले कर्तव्य पार पडत असताना आपणावर विधिमंडळाच्या सर्वोच्च परंपरा राखण्याचे उत्तरदायित्त्व आणि जबाबदारी आहे. विधिमंडळाला लोकशाहीचे मंदिर संबोधले जाते. त्यामुळे, दोन्ही सदस्यांनी सभागृहात खेद व्यक्त करावा, अशा सूचनाही अध्यक्षांनी केल्या होत्या. गोपीचंद पडळकर आणि जितेंद्र आव्हाड यांनी या दोघांना सभागृहात आणल्याबद्दल सभागृहात खेद व्यक्त करावा, तसेच, भविष्यात अशा घटना घडणार नाहीत याची दखल घ्यावी, अशा सूचनाही विधानसभा अध्यक्षांनी दिल्या आहेत.

दरम्यान, विधानसभा अध्यक्षांच्या सूचनेनंतर आमदार गोपीचंद पडळकर आणि आमदार जितेंद्र आव्हाड यांनी सभागृहात खेद बाळगत करत दिलगिरी व्यक्त केली आहे.

## त्यांच्या मते....

▣ मोदीच्या नेतृत्वाखाली २०२९ निवडणुक लढवावी लागणे ही भाजपाची मजबुरी

-निशीकांत दुबे

☛ दुसरी प्रतीमाच निर्माण होऊ दिलीच नाही.

▣ सांगली जिल्ह्यातील इस्मालपुर शहराचे नाव बदलून ईश्वरपूर केले

-छगन भुजबळ

☛ नान बदलून विकास होतो का.

▣ हातवारे करू नका, आवाज खाली करा, शहाणपना करू नका.

-पोलीसांना उद्देशुन आ.रोहित पवार

☛ 'दादा' च ते

▣ राजकीय परिवारात जन्म घेता म्हणून, दादागिरीचे लायन्स घेऊन येताका

-पोलीस बॉईज संघटना

☛ राजकीय घराणे दादागिरीचे लायन्सस देणारी केंद्रच झाली आहेत.

## शिवाबाई लाडलापूरे यांचे निधन



लातूरः- येथील ज्येष्ठ नागरीक शिवाबाई शिवअप्पा लाडलापूरे (८५) यांचे आज आझाद चौक येथील राहत्या घरी अल्प आजाराने निधन झाले.

त्यांच्या पार्थिवावर शनिवार दि. १९ जुलै रोजी सकाळी १० वा. विरशैव बेलपत्री स्मशानभुमीत अंत्यसंकार करण्यात येणार आहेत. शिवाबाई लाडलापूरे यांच्या पश्चात एक मुलगा, दोन विवाहीत मुली, नातवंडे असा परिवार आहे. लातूर येथील बी झोनचे क्षेत्रीय अधिकारी संतोष लाडलापूरे यांच्या शिवाबाई या मातोश्री होत.

## घनकचरा व्यवस्थापनातून उपजीविकेच्या संधी; प्रशिक्षण शिबिर संपन्न

उदगीर :- स्वच्छ भारत अभियान (नागरी) २.० अंतर्गत दीनदयाळ अंत्योदय योजना - राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियानातील महिला बचत गटांसाठी घनकचरा व्यवस्थापन उपजीविकेच्या संधी क्षमता बांधणी प्रशिक्षण आज दिनांक १६ जुलै २०२५ रोजी उदगीर नगरपरिषद कार्यालयात यशस्वीरित्या संपन्न झाले. या प्रशिक्षण कार्यक्रमास मुख्याधिकारी तथा प्रशासक सोमनाथ जाधव यांची प्रमुख उपस्थिती लाभली. प्रशिक्षणाचे आयोजन कुशाग्र इनोव्हेशन फाउंडेशन, पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते.स्वच्छ भारत अभियान (ना.) २.० ही योजना १ ऑक्टोबर २०२१ पासून सुरू असून, तिचा मुख्य उद्देश शहरे 'कचरामुक्त' करणे हा आहे. यामध्ये 'सर्क्युलर इकॉनॉमी' म्हणजेच पुनर्वापरावर आधारित अर्थव्यवस्थेला चालना देणे आणि कचऱ्याचे व्यवस्थापन हे उत्पन्नाचे साधन बनविणे यावर भर दिला जात आहे. या पार्श्वभूमीवर महिला बचत गटांना खालील गोष्टींवर प्रशिक्षण देण्यात आले. ओला व सुका कचरा वेगवेगळा करून घंटागाडीत देणे, सुका कचरा प्रक्रिया केंद्र आणि RRR (Reduce-Reuse-Recycle) केंद्र चालवणे, फुलांच्या निर्माल्यापासून अगरबत्ती तयार करणे, ओल्या कचऱ्यापासून कंपोस्ट खत निर्माण करणे, प्लास्टिकचा पुनर्वापर, कापडी पिशव्यांचा उपयोग यादी विषयावर प्रशिक्षणास उपस्थित महिला गटांना कुशाग्र इनोव्हेशन फाउंडेशनचे अधिकारी ऋषिकेश सिद्धेवाड व बालाजी कदम यांनी मार्गदर्शन केले. प्रशिक्षण यशस्वीपणे पूर्ण करणाऱ्या महिला सदस्यांना प्रमाणपत्र व कापडी पिशव्यांचे वितरण मुख्याधिकारी सोमनाथ जाधव यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रशिक्षण कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शहर अभियान व्यवस्थापक विशाल गुडसुरकर, महारुद्र गालट, समुदाय संसाधन व्यक्ती सौ. अनिता चौधरी आणि सौ. सुवर्णा धुळेकर यांनी मोलाचे योगदान दिले.

# आज पासून लातूर परिचारिकांचे काम बंद आंदोलन

लातूर :- सातव्या वेतन आयोगातील वेतनत्रुटी आणि कंत्राटी भरतीच्या निषेधार्थ महाराष्ट्र राज्य परिचारिका संघटनेचे राज्यव्यापी आंदोलन करत असून राज्य शासनाने यांची दखल न घेतल्यामुळे आज दिनांक १८ जुलैपासून महाराष्ट्र राज्य परिचारिका संघाच्या वतीने बेमुदत काम बंद आंदोलन करण्यात येत आहे.

अधिपरिचारिका, परिसेविका, पाठयनिर्देशिका तसेच सार्वजनिक आरोग्य विभागातील बालरोग परिचारिका या पदाच्या वेतन त्रुटी निवारण करावे., राज्यातील परिचारिकांना केंद्र शासनाप्रमाणे नर्सिग भत्ता ७२०० व गणवेश भत्ता १८०० मंजूर करावा व पात्र परिचातिकंना शैक्षणिक भत्ते मंजूर करावे., पदनाम बदल- केंद्र शासनाप्रमाणे राज्यातील परिचारिकांच्या पदनामा मध्ये बदल करण्यात यावा., कंत्राटि पदभरती नियम शासनाच्या परिपत्रकातून वगळण्यात यावे., कायमस्वरूपी १००% पदभरती,पदनिर्मिती,व पदोन्नती करण्यात याव्यात, स्वतंत्र संचालनालयाची स्थापना करण्यात यावी., अधिपरिचारिका सेवा प्रवेश नियमातील लिंगभेद निर्माण करणारे स्त्री पुरुष प्रमाण ८०:२० वगळावे., विद्यार्थी




विद्यावेत वाढवण्यात यावे., शासनमान्य सघटनेचे निवेदने प्रधान्याने विचारात घ्यावेत व नियमीत बैठक घेण्यात यावी., बदली धोरणातून परिचारिकांना वगळण्यात यावे. आदी या संघटनांच्या मागण्या आहेत.

या सर्व मागण्यासहित आज पासून परिचारिका बेमुदत आंदोलन करित आहेत त्यामध्ये लातुर जिल्हातून ५३८ महिला व पुरुष कर्मचारी आंदोलनात सहभागी असल्याची माहिती महाराष्ट्र राज्य परिचारिका संघटना राज्यखिजनदार श्री राम सुर्यवंशी, राज्यसंघटक पांडुरंग गव्हाणे, कोर कमिटी सदस्य योगेश वाघ, शिला कांबळे, सुरेखा लहाणे,लातुर शाखेच्या अध्यक्षा उपाध्यक्ष संजीव लहाणे, श्रीमती रेणुका पाटील, सचिव भाग्येश्री जोगदंड, सहसचिव भगवान केंद्रे, खजिनदार श्रीमती बालीका सावंत, सहखजिनदार दिपक शिंदे, संभाजी केंद्रे , पाठवनिर्देशक अंजना गिरी, सुनीता गिरी,स्त्री रुग्णालय लातुर येथील सचिव श्रीमती आशा कुरुळेकर, संघटक श्रीला गोचडे व किरण निकम, मिना दैवज्ञ, निर्मला गाडेकर, धनश्री गोसावी, सतिश करे, ज्ञानेश्र्वर मुंडे, अमित मलिशे, संतोष केंद्रे,सुधाकर केदार,शरद वाडकर, शुभंम वानखेडे,हरिष वानखेडे, हरिष हिप्परकर, आनंद पवार, रवि मुदमे इ.उपस्थित होते.

# कालबदल सूत्र

मानवी कुविचारांच्या कृत्यामुळे कलियुगातील येणाऱ्या नैसर्गिक आपत्तींना तोंड देण्यासाठी मानवच शक्तिहीन होईल. कालबदल सूत्र यांच्या नियमाप्रमाणे आपण चालत असल्यामुळे पंचतत्त्व संतुलित करणारे सर्व घटक नामशेष करत चाललो आहोत आणि या आपल्या कर्माचे फळ, आपल्याला कलीयुगाचा अंत याच्या रूपात मिळणार आहे. मानवी कालबदल सूत्र ही निसर्गनियमांवर हावी केल्यामुळे सर्व जीवसृष्टी ही नामशेष होणार आणि मग युगप्रवर्तन होणार. आपण नेहमी म्हणतो की माझे आरोग्य माझ्या हाती तसेच माझे भविष्य सुद्धा माझ्याच हाती आहे. याचे कारण असे की, शारीरिक, मानसिक आणि नैसर्गिक या तिन्ही गोष्टी यात सामावलेल्या आहेत. कदाचित हा लेख कटू वाटेल; परंतु ते सत्य आणि वस्तुस्थिती आहे. आपण शून्यापासून सुरुवात करू. प्राचीन काळापासून ते आतापर्यंत सर्वनाशाची सुरुवात ही कुटुंबातूनच झाली आहे; परंतु तरीही तेव्हाची कुटुंब व्यवस्था ही खूप सुदृढ होती पण वैचारिक शत्रुत्वातून वादापासून ते युद्धापर्यंत सर्वनाश होत गेला. आताच्या काळातील आपण कौटुंबिक परिस्थिती पाहूया. म्हणजे असं की लहानपणी तरी आपण पूर्ण आई-वडिलांवर अवलंबून असतो. आपली खरी सुरुवात तरुण झाल्यावर होते, तेव्हा वेळ येते ती करिअर आणि लग्नाची. आताच्या काळात कुटुंब व्यवस्था परिपूर्ण नसल्यामुळे फक्त आणि फक्त पैशांच्या गर्दीत अडकून आपण अनेक नाती तोडून टाकण्यास मारक ठरतो. त्यामुळेच आज मुला-मुलींची लग्न होत नाहीत. आधीच्या पिढ्यांमध्ये फक्त तडजोड महत्त्वाची होती आणि त्यामुळे संसार हे टिकून होते. एकत्रित कुटुंबामुळे आपल्या भारतात आपण निसर्ग नियमाप्रमाणे जगत होतो. एकत्रित असल्यामुळे संरक्षण होत होते. आपली संस्कृती आणि संस्कार सांभाळत होतो. आताच्या काळात तसे नसल्यामुळे यांच्या मानसिक अविचारांमुळे येणाऱ्या पिढ्या या स्वतःचं अस्तित्व घडवण्याच्या नादात नातेसंबंध कमी करत एकटे राहण्यास पसंती देत आहेत. दुसरी गोष्ट आताच्या काळात प्रत्येकाला धनलक्ष्मी पाहिजे कारण आपली शारीरिक आणि मानसिक स्थिती चांगली राहावी म्हणून ती गरज आहे. पण हा पैसा खरंच ती पूर्तता करतो का हे फार महत्त्वाचे आहे. मात्र याचा कोणीही विचार करत नाही कारण ही धनलक्ष्मी आपल्या आयुष्यात जास्त असली तरी कमी स्वरूपात तिचं पारडं जड आहे. आता पाहूया निसर्ग नियम. निसर्ग नियमाप्रमाणे एवढे प्रदूषण वाढले आहे की, आता श्र्वास घेणे शक्य होत नाही. कारण हवेतील ऑक्सिजन दिवसेंदिवस कमी होत जातोय. परिणामी आपल्याला अनेक प्रकारच्या, अनेक शारीरिक व्याधी होत आहेत. आधुनिकतेच्या वळणावर आपण वळण घेतल्यामुळे थोडक्यात आपली बुद्धी भ्रष्ट होत गेली आणि आपण चुकीच्या मार्गावर राहून सुद्धा योग्य मार्गावर आहोत अशी समजूत करून भारतीय संस्कृती आणि संस्कारांचा बळी देत चाललो आहोत. त्यातच भरीसभर म्हणून येणाऱ्या पिढीतील कितीतरी टक्के समाज हा मोबाईलच्या आहारी गेला. दिवसाची रात्र, रात्रीचा दिवस झाला. साहजिकच शारीरिक दुष्परिणाम होत जाणार. आधीच शारीरिक कमकुवतपणा आणि त्यात ऑक्सिजनची कमतरता, प्रदूषणाची भीषणता शिवाय अध्यात्मिकतेच्या अभावामुळे कुविचारांना खतपाणी आहेच. आपणच शेखचिल्लीसारखे आपले भविष्य धोक्यात आणत चाललोय. एक सृष्टी संशोधकाच्या रूपाने माझ्या निरीक्षणानुसार या सजीव सृष्टीतील प्रत्येक घटक या निसर्गाला परिपूर्ण आणि सुदृढ करण्याच्या प्रयत्नातच असतो. त्याचे या पृथ्वीवरील कर्म यानुसारच तो पूर्ण आयुष्याचे गणित करतो. निसर्ग नियमाप्रमाणेच जगतो. प्रत्येक घटक जरी अन्नसाखळी असली तरीही मुळात त्याच्यात शत्रुत्व हे नसते. सर्व सद्गुणांनी परिपूर्ण असेच हे घटक आहेत. वाघ सुद्धा विनाकारण कोणावरही हल्ला करत नाही; परंतु मानव पूर्णपणे त्याविरुद्ध आहे. तो स्वतः सुद्धा निसर्ग नियमाप्रमाणे जगत नाही आणि इतरांनाही जगू देत नाही. मानवाने चुकीच्या दिशेला जाऊ नये म्हणून प्राचीन काळातील ग्रंथांमधून त्याच्यावर संस्कृती आणि संस्कारांचा वर्षाव आपल्या बुद्धिमान ऋषीमुनींनी केला होता; परंतु आज कोणीही अध्यात्मिक नसून आधुनिकतेच्या नावाखाली विध्वंसक वृत्तीचा झाला आहे. परमेश्र्वराने निसर्गाच्या परिपूर्ण खजिन्याने ही पृथ्वी बनविली. या पृथ्वीवर सगळ्यात बुद्धिमान प्राणी हा मानव निर्माण केला. खरं तर परमेश्र्वर खूपच दयाळू आहे. त्याने या सजीव सृष्टीतील प्रत्येक सजीव घटकाला परिपूर्ण पंचतत्त्व संतुलन करूनच ही भूमाता दिली; परंतु मानवी स्वभाव दिवसेंदिवस तिला ओरबाडत राहिला. खरंतर ही भूमी स्वतः परिपूर्ण असल्यामुळे तिचे कार्य करतच असते; परंतु तिच्या कार्यात प्रत्येक वेळेला तिला अडचणीत आणणारा हा मानवच आहे. तिच्या कार्यात सततचा अडथळा आल्यामुळे तिची निसर्गाची घडी ही कायम चुकत चालली आहे. परिणामी निसर्गाचे म्हणजेच या पंचतत्त्वाचे असंतुलन होत आहे. या सजीव सृष्टीतील इतर घटकांप्रमाणे निसर्ग नियमानुसार जीवन हे फार आवश्यक आहे. कसं आहे मानवाचे कुविचार, त्याचे दुर्गुण हे जर आपल्या पालकांची परिवाराची काळजी घेत नसतील तर या भूमातेची काय घेतील? फक्त मानव श्रीमंतीच्या पोकळ दिखाव्याच्या मागे फक्त पैसा हा घटक महत्त्वाचा समजायला लागला आहे. त्याच्या डोळ्यांवर असणारी ही झापड सगळ्या संस्कारांना तिलांजली देत आहे. महत्त्वाचे म्हणजे जेव्हा निसर्गाचा कोप होईल तेव्हा तिथे धर्म, जाती-प्रजाती काहीही पाहिली जाणार नाही. यातून मानवाने काय बोध घ्यायचा तो घ्यावा. या जगातील ज्या व्यक्ती समाजाला योग्य दिशा दाखवतात त्या व्यक्ती म्हणजे संत. आपण आपल्या चुका सुधारणे आता शक्य नाही असे नाही कारण हे जग या संतांच्या भूमीचे ते कोणत्याही धर्माचे कोणत्याही भूमीत राहणारे असो. या संतांमुळेच आज ही भूमी जगते, श्र्वास घेतेय. कधी विचार केलाय का आपण प्रगतीच्या नावाने एवढे शोध लावलेत. जे प्राचीन काळातही होते त्याचा शेवट काय झालाय? ही युग परिवर्तन का झाली? थोडा विचार करा तुम्हाला उत्तर मिळेल. परमेश्र्वराने एवढी बुद्धी देऊन सुद्धा आपण आपल्या हाताने सर्वनाश करत आहोत. या निसर्गातील इतर घटकांचा काय दोष आहे? परंतु आज आपण हे घटक स्वतःच्या स्वार्थासाठी नामशेष केले आहे. भवितव्यात असे होणार आहे की मानवी घटक त्यांच्या कर्मामुळे नातेसंबंध नसल्यामुळे एकांतात आणि एकटेच राहतील. शरीर सुद्धा साथ देणार नाही. थोडक्यात काय तर जिथे निसर्गसंपत्तीच नाही तर तिथे धनसंपत्ती आणि कुविचार काय कामाचे? परिणामी अनेक व्याधींनी ग्रस्त, त्यात निसर्गाचा कोप या सर्वांना सामोरे जावे लागेल आणि अंततः हे युग संपेल. आपण आपले पूर्ण जगण्याचे गणितच बदलले आहे. रात्र आणि दिवस हे आपल्यासाठी पूर्णपणे बदलले आहे. एक लक्षात ठेवा 'काळाप्रमाणे' याच्या नावाखाली आपण स्वतः कितीही बदललो तरी ऋतू आणि निसर्ग त्याचे कार्य चोख बजावत असतो. सूर्याला जेव्हा उगवायचे तेव्हाच उगवतो. रात्र जेव्हा व्हायची तेव्हाच होते. आपण आपल्या नियमांमध्ये बदल केला आहे. आपण निसर्ग नियमांची सूत्र जी आपल्या भारतीय संस्कृतीत संस्कारांच्या रूपामध्ये आपल्याला मिळाली होती ती सूत्रच आपण विसरलो किंबहुना ती मिटवली. कारण आपण नवयुगाच्या दिशेने असणारी आपली सूत्र निर्मित केली. परिणाम सर्वच घटकांना भोगावे लागणार.

**-डॉ. महालक्ष्मी वानखेडकर**

# टोमॅटोचे भाव उतरले; उत्पादक संकटात



पुणे : सध्या टोमॅटोचे भाव कमालीचे उतरल्याने शेतक-यांच्या डोळ्यांत अक्षरश: पाणी आले असल्याचे चित्र दिसत आहे. बळिराजा शेतात मेहनत करून स्वकर्तृत्वासह कौशल्याने उत्पादन मिळवतो; परंतु समाधानकारक भाव मिळत नसल्याने आर्थिक चणचण त्याच्या नशिबी आहे.

कमी कालावधीत अधिक उत्पन्न मिळवून देणा-या टोमॅटोचे यावर्षी भाव गडगडल्याने राज्यातील शेतक-यांना मोठा तोटा सहन करावा लागत आहे. त्यामुळे टोमॅटो उत्पादन करणा-या शेतक-यांचे लाखो रुपयांचे आर्थिक नुकसान होत असल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे.

शेतकरी अल्पकाळात भरपूर व रोख उत्पन्न देणारे पीक म्हणून टोमॅटो हे पीक घेतात. एक एकरात पाच हजार किलोपेक्षा अधिक उत्पन्न घेणारे शेतकरी या भागात आहेत. छोट्या-छोट्या प्लॉटच्या साह्याने जास्तीत जास्त उत्पन्न घेऊन जीवन जगण्यासाठी संघर्ष करणा-या शेतक-यांचे टोमॅटोचे भाव घसरल्याने आर्थिक नुकसान होत आहे. टोमॅटोची आवक वाढल्याने कॅरेटचे दर २०० ते ४५० रुपयांवर आले असून, सरासरी जुन्या टोमॅटोंना २०० ते ३०० रुपये भाव आहे. मागणी कमी आणि उत्पन्न अधिक अशी परिस्थिती आहे. अवकाळीमुळे पिकांचे नुकसान झालेले असताना देखील काही शेतक-यांनी मोठ्या कष्टाने पीक वाढवले; परंतु त्याचे दर घसरल्याने शेतकरी कोसळू लागला आहे. केलेला खर्चही निघत नसल्याची खंत अनेक शेतक-यांनी व्यक्त केली आहे.

लागवडीपासून प्रत्यक्ष उत्पन्न सुरू होईपर्यंत या पिकाची खूपच काळजी घ्यावी लागते. कीटकनाशक फवारणी, मशागत, खतांचा खर्च असतोच. आधार देण्यासाठी लागणा-या काठ्या व तारा, सुतळ्या आणि त्यासाठी द्यावी लागणारी मंजुरी. ज्यावेळी प्रत्यक्ष उत्पादनाला सुरुवात होते त्यावेळीही खर्च मोठ्या प्रमाणात होतो; परंतु याहीपेक्षा खर्चिक काम असते ते टोमॅटो झाडांना फळे आल्यानंतर नजीकच्या काळात दरात वाढ झाली नाही तर शेतक-यांचे लाखो रुपयांचे नुकसान होईल. शेतकरी स्थानिक बाजारपेठेत टोमॅटो विकत असून पण काही टोमॅटो उत्पादक यांनी दर नसल्याने टोमॅटो शेतात ठेवणे पसंत केले आहे.

दरवर्षी बाजारभाव चांगले असतात, पण यंदा मात्र सुरुवातीपासूनच टोमॅटोला बाजारभावाची साथ मिळालीच नाही. सुरुवातीला कॅरेटला ८०० रुपये भाव होता. नंतर ५००, ४५०, ३००, १५०, २०० असे दिवसागणिक बदलत आहेत. यंदा उष्णतेचे अधिक प्रमाण, त्यात अवकाळी पाऊस व मे महिन्यात आलेल्या सततच्या पावसामुळे टोमॅटोवर पांढरी माशी, करपा, काळा डाग आदी रोगांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणावर झाला. त्यातच बाजारभाव देखील कमी मिळाला त्यामुळे टोमॅटो फेकून देण्याची वेळ आली आहे.

# संजय गांधी निराधार योजनेच्या लाभार्थ्यांच्या आधार लिंकसाठी शिबिरांचे आयोजन

मुंबई : विविध कल्याणकारी योजनांचा लाभ थेट लाभार्थ्यांच्या खात्यावर देण्यासाठी आधार लिंक अनिवार्य केले आहे. संजय गांधी निराधार योजनेसाठीही आधार जोडणी अनिवार्य आहे.



लाभार्थ्यांची आधार नोंदणी करण्यासाठी शिबिरांचे आयोजन करण्यात येत असल्याची माहिती, मंत्री नरहरी झिरवाळ यांनी आज विधानपरिषदेत दिली. सदस्य अभिजित वंजारी यांनी उपस्थित केलेल्या प्रश्र्नाला उत्तर देताना मंत्री झिरवाळ बोलत होते.आतापर्यंत ४० लाख ४८ हजार ९८८ लाभार्थ्यांचे आधार लिंक झाले असल्याचे सांगून मंत्री झिरवाळ म्हणाले की, उर्वरित अपूर्ण नोंदणीमुळे थेट लाभ मिळू शकलेला नाही. यामध्ये काही मृत व्यक्तींचाही समावेश आहे. विशेषत: कुष्ठरोगी, हातांनी काम करणारे श्रमिक, महिला यांचे थंब इम्प्रेशन उमटत नसल्याने आधार लिंक होत नाही. कलेक्टर, महसूल आयुक्त, यांच्यासोबत बैठक घेऊन आधार लिंक प्रक्रिया सोपी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

# ज्ञानचंद अदंबर ठरली भारतातील नंबर १ दारू

## आंतरराष्ट्रीय व्हिस्की स्पर्धेत पटकावला मानाचा किताब

नवी दिल्ली : तळीरामांसाठी खास बातमी आहे. आतापर्यंत सिंगल माल्ट व्हिस्की श्रेणीत इंद्री ही भारतातील अव्वल क्रमांकाची दारू होती, मात्र आता इंद्रीने पहिला क्रमांक गमावला असून आता नंबर वनचा मुकुट नवीन सिंगल माल्ट ज्ञानचंद अदंबर व्हिस्कीने पटकावला आहे.

अलीकडेच लास वेगासमध्ये आंतरराष्ट्रीय व्हिस्की स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. यात देवांस मॉडर्न ब्रुअरीज कंपनीच्या नवीन सिंगल माल्ट ज्ञानचंद अदंबर व्हिस्कीने भारतीय सिंगल माल्ट व्हिस्की आणि सर्वोत्कृष्ट भारतीय व्हिस्की या दोन्हीचे विजेतेपद पटकावले आहे. ज्ञानचंद अदंबरने पटकावलेला दुहेरी मुकुट जम्मूच्यादेवांस मॉडर्न ब्रुअरीजसाठी एक मोठी उपलब्धी आहे. ही व्हिस्की वेगाने मद्य बाजारपेठेत आपली व्याप्ती वाढवत आहे. देवांस मॉडर्न ब्रुअरीजचे अध्यक्ष प्रेम दिवाण याबाबत बोलताना म्हणाले की, 'हा सन्मान आमचे पारंपारिक कौशल्य आणि नवीन चवीचे महत्व अधोरेखित करत आहे. ज्ञानचंद अदंबर आमच्या कठोर परिश्रमाला एक नवीन रूप देत आहे.

आयडब्ल्यूसी ही जगातील सर्वात प्रतिष्ठित व्हिस्की स्पर्धा आहे. यात ब्लाइंड टेस्टिंगद्वारे व्हिस्कीचा दर्जा ठरवला जातो. अदंबर एक नॉन-पीटेड सिंगल माल्ट आहे जो अमेरिकन एक्स-बॉर्बन डब्यांमध्ये तयार केला गेला आहे. यात वाळलेली जर्दाळू, मध, टोस्ट केलेले मसाले आणि कॅरॅमलचा समावेश असतो, त्यामुळे या व्हिस्कीला परीक्षकांकडून चांगले गुण मिळाले आहेत.



प्रसिद्ध व्हिस्की समीक्षक जिम मरे यांनी म्हटले की, 'मी ही व्हिस्की टेस्ट करून मोहित झालो आहे. स्कॉटिश माल्टचा अनुभव देणारी ही आतापर्यंतची सर्वोत्तम भारतीय व्हिस्की आहे. सिंगल माल्ट प्रेमींसाठी ही खरोखरच खास व्हिस्की आहे. पहिल्यांदा टेस्ट केल्यानंतर मला ही खरोखरच भारतीय व्हिस्की असू शकते का? असा प्रश्र्न पडला होता. अदंबर ही व्हिस्की ज्ञानचंद इंडियन सिंगल माल्टचे नवे व्हर्जन आहे, याआधी ज्ञानचंद इंडियन सिंगल माल्टला भारतात चांगला प्रतिसाद मिळाला होता.

सध्या अदंबर फक्त दिल्ली आणि हैदराबाद विमानतळांच्या ड्युटी-फ्री स्टोअरमध्ये उपलब्ध आहे, आगामी काळात कंपनी किरकोळ बाजारातही ही व्हिस्की लाँच करण्याची योजना आखत असल्याची माहिती समोर आली आहे. कंपनीचे संस्थापक दिवंगत ज्ञानचंद यांच्या नावावर असलेली ज्ञानचंद सीरिजमधील व्हिस्की जम्मूमध्येच डिस्टिल्ड, मॅच्युअर आणि पॅक केली जाते. हा व्हिस्की भारतीय व्हिस्की परंपरेची ही आधुनिक आवृत्ती असल्याचे बोलले जात आहे.

# शालेय इमारतींच्या सुरक्षेसाठी शासनाचा पुढाकार

## - राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर

मुंबई : राज्य सरकारने शाळा इमारतींच्या सुरक्षिततेबाबत गंभीर पावले उचलली आहेत, अशी माहिती शालेय शिक्षण राज्यमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी विधान परिषदेत दिली.

राज्यमंत्री डॉ.भोयर यांनी सांगितले की, अहमदनगर जिल्ह्यातील शाळेच्या वर्गखोलीचे छत कोसळून तीन विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला होता.

या पार्श्र्वभूमीवर जिल्ह्यातील सर्व जिल्हा परिषद प्राथमिक शाळांचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात आले. आजपर्यंत २,५३८ वर्गखोल्यांचे निर्लेखन




करण्यात आले असून, १,४६२ नवीन वर्गखोल्यांचे बांधकाम पूर्ण झाले आहे. तसेच ३,४३५ वर्गखोल्यांची दुरुस्ती देखील करण्यात आली आहे.

पुणे जिल्ह्यातील शाळांबाबत माहिती देताना त्यांनी सांगितले की, ३६८ मोडकळीस आलेल्या वर्गखोल्यांपैकी २३४ वर्गखोल्यांचे बांधकाम सुरू असून, ३.५ कोटी खर्च करण्यात आला आहे. २०२४-२५ या आर्थिक वर्षात महानगरपालिकेच्या शाळांसाठी एकूण ९ कोटींची तरतूद करण्यात आली आहे.

# कर्नाटकी कांद्याचा महाराष्ट्राला फटका

## दक्षिणेतील मागणी घटली, प्रतिक्विंटल दर दीड हजारावर

नाशिक : दक्षिणेकडील राज्यांमध्ये स्थानिक कांद्याचे उत्पादन आल्याने परिणामी मागणी कमी झाली, तसेच दुस-या बाजूला जिल्ह्यातील बाजार समित्यांमध्येही कांद्याची आवक वाढल्याने मागणीपेक्षा पुरवठा जास्त झाल्याने कांदा दरात सातत्याने घसरण होत आहे. त्यामुळे केंद्र सरकारने कांद्याच्या निर्यात धोरणात सातत्य ठेवून निर्यातीसाठी प्रोत्साहन देण्याची गरज व्यक्त होत आहे.

कर्नाटकमधून कांद्याची आवक सुरू झाली आहे. त्यामुळे आंध्र प्रदेश, तामिळनाडू आणि केरळसारख्या दक्षिणेकडील



राज्यांत स्थानिक पुरवठा वाढला आहे. परिणामी, हक्काची बाजारपेठ असलेल्या या राज्यात महाराष्ट्रातील कांद्याला ब्रेक लागला आहे. यावर्षीच्या उन्हाळ कांद्याच्या हंगामाला अवकाळी पावसामुळे फटका बसला आहे. कांदा पिकाचे मोठे नुकसान झाले असून, साठवणूक केलेला कांदाही नैसर्गिक आर्द्रतेमुळे खराब होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

यावर्षी रबी हंगामात देशभरात कांद्याचे उत्पादन अधिक झाल्यामुळे बाजारपेठांमध्ये साठा वाढला आहे. त्याचा थेट परिणाम म्हणून सध्या बाजारात केवळ १२०० ते १५०० रुपये प्रतिक्विंटल दर मिळत आहे. लासलगाव कृषि उत्पन्न बाजार समितीत बुधवारी उन्हाळकांद्याला किमान ६००, कमाल २,११२ रुपये तर सरासरी १५०० रुपये प्रतिक्विंटल दर मिळाला. मिळालेल्या या दरात शेतक-यांचा उत्पादन खर्चही निघत नसल्याने त्यांचे आर्थिक नुकसान होत आहे.

# खिचडी

भारतात केल्या जाणार्या सर्व प्रकारच्या खिचडी खाण्याचे भाग्य मला लाभले आहे, पण त्यातली सर्वात चवदार आणि माणुसकीचा ओलावा असलेली खिचडी मी नांदेड ते यवतमाळ या प्रवासात खाल्ली आहे. ही एकोणीसशे एकोणनव्वदची गोष्ट आहे. ती श्रावणातली चिंब पावसाची रात्र होती. एवढा पाऊस होता की समोरचा रस्ताच दिसत नव्हता. त्यामुळे आम्ही चक्क रस्त्यावर एका कडेला गाडी लावून थांबलो होतो. आमची बराच वेळ थांबलेली गाडी पाहून रस्त्याच्या पलीकडच्या घरात राहणारा, इरलं पांघरलेला एक शेतकरी जवळ आला. त्याने चक्क हात जोडून आम्हाला पाऊस थांबेपर्यंत त्याच्या घरी चलण्याची विनंती केली. त्यावर आम्ही एकमेकांकडे पाहतच राहिलो. गाडीत दोघी बायका आणि दोन पुरुष होते. 'वाटमारी तर नसेल'! आमच्या प्रत्येकाच्या मनात आले होते. आम्ही कुणीच काही बोललो नाही आणि गाडीतून उतरलोही नाही.

तेवढ्यात त्या रस्त्यापलीकडून दोन लहान मुले हातात खिचडीचे मोठाले द्रोण घेऊन आली. त्या माणसाने ते द्रोण आमच्या पुढे केले आणि परत हात जोडले. मग आम्ही खिडक्यांच्या काचा पूर्ण खाली करून ते द्रोण घेतले. त्या द्रोणात वाफाळलेली गरमागरम खिचडी होती. अहाहा! त्या खिचडीचा वास असा काही येत होता की बस! आम्हाला भूक तर लागलीच होती. साधी डाळ, तांदळाची खिचडी, त्यावर हलका आणि थोडासा तिखट मसाला पखरलेला होता. खिचडीसोबत तळलेले सालींचे सांडगे आणि कुटाच्या मिरच्याही होत्या. खिचडीवर तूपही भरपूर सोडलेले होते. आम्ही पहिल्यांदा त्या खिचडीचा हळूच एक घास घेतला आणि मग पटापट खायला सुरुवात केली. आमच्या हातातला द्रोण संपेपर्यंत अजून दोन खिचडीचे मोठे द्रोण आणि बरोबर चार छोटे द्रोण आले. त्या छोट्या द्रोणात शिरा होता.

आमचे खाऊन होईपर्यंत पाऊसही कमी झालेला होता. आम्ही खाली उतरून त्या शेतकर्याचे आभार मानले. त्याला काही पैसे देऊ केले. पण त्यांनी नकार दिला. त्या शेतकर्याच्या घरात त्या दिवशी कसली तरी श्रीविष्णूंची पूजा होती. त्यासाठी त्यांनी खिचडी आणि शिर्याचा प्रसाद केला होता. पण त्या दिवशीच्या तुफान पावसामुळे, गावातून त्यांनी बोलावलेले कोणीच त्या पूजेसाठी येऊ शकले नव्हते. त्यामुळे तो प्रसाद आम्हाला मिळाला. आमच्याकडे विदर्भातील खिचडी करायचे. साधी तूरीची डाळ आणि तांदूळ, हळद, मीठ घातलेली खिचडी! पण त्या गरमागरम खिचडी तूप आणि लिंबाच्या लोणच्याबरोबर किंवा गार खिचडीवर हिंग आणि लसूण घातलेले फोडणीचे तेल किंवा कच्चे तेल घालायचे. त्याबरोबर कच्चा कांदा आणि पापड असेल तर आणखी उत्तम.

आमची खिचडी साधारण मोकळी शिजलेली असते. विदर्भात मसाला खिचडी नावाचा खिचडीचा उपप्रकार करतात. त्यासाठी भरपूर तेलाला मोहरी आणि हिंगाची फोडणी घालून त्यात चिरलेले कांदे आणि मिरच्या परतवून घेतात. त्यानंतर त्यात चिरलेले टोमॅटो घालून ते शिजवतात. मग त्यात मसाला आणि तिखट घालून परततात. त्यानंतर त्यात शिजवलेली खिचडी टाकून पुन्हा छान परततात. आमच्याकडच्या खिचडीबरोबर कढी असायलाच पाहिजे अशी काही गरज नसते. पण बहुतेक ठिकाणी खिचडीबरोबर कढी असावीच लागते. खिचडी के चार यार, घी, कढी, पापड और आचार अशी उत्तर भारतीयांच्यात तर म्हणही आहे.



पश्र्चिम महाराष्ट्रात खिचडी करताना मुगाची डाळ आणि तांदूळ धुवून पाणी काढून टाकतात. मग थोडेसे तेल घालून ते सर्व चांगले परतून घेतात. मग त्यात आधणाचे पाणी घालतात. त्यानंतर त्यात भाजलेल्या जिर्या-खोबर्याचे वाटण, मीठ आणि हळद घालतात. ती खिचडी शिजली की त्यावर खवलेले ओले खोबरे आणि हिरवीगार बारीक चिरलेली कोथिंबीर घालतात. ती खिचडी थोडी मऊसर असते त्यामुळे पातळ कढीबरोबर फार छान लागते. विशेषतः श्रावणात मंगळागौरीच्या वेळी जागरणाचे खेळ खेळायला किंवा एखाद्या शिबिराच्या आदल्या दिवशी कढी खिचडीचे जेवण तरतरी आणि उत्साह देते.

गुजराथी आणि राजस्थानी खिचडी किंचित अधिक मऊ, पातळ असते. त्यांची कढी मात्र मेथी, लवंग, दालचिनीयुक्त, दाट आणि गोडसर असते. पंजाब आणि हरयाणातील खिचडी अधिक मसालेदार असते. कर्नाटकातल्या खिचडीला खारा पोंगल म्हणतात. त्यासाठी प्रथम कोरड्या कढईत मिरी भाजतात. मग त्यात तांदूळ, मुगाची डाळ आणि अगदी थोडी हरभरा डाळ भाजून घेतात. त्यात हळद, मीठ आणि जरा जास्त पाणी घालून शिजवतात. खिचडी शिजल्यावर तिला तुपात मोहरी, जिरे, हिंग, कढीपत्ता, खाराच्या मिरच्या, शेंगदाणे, आल्याचा किस आणि तांबड्या मिरच्या घालून फोडणी देतात आणि वरून लिंबू पिळतात. खार्या पोंगलबरोबर पोह्याचा पापड आणि कैरीचे लोणचे असले तर मग काय विचारायलाच नको!

पश्र्चिम बंगालमध्ये दूर्गापूजेच्या वेळी खिचडीचा भोग असतो. ती खिचडी बनवण्यासाठी सर्वात प्रथम मुगाची डाळ भाजावी लागते. त्यानंतर जेवढी डाळ, तेवढेच गोविंद भोग नावाचे तांदूळ घेऊन पाण्यात भिजवून ठेवतात. त्यानंतर मोहरीच्या तेलात बटाटे सोनेरी रंगावर आणि फ्लॉवर छान परतून शिजवतात. ते कढईतून बाजूला काढून ठेवले की त्यातच परत थोडे मोहरीचे तेल घालून ते गरम झाले की त्यात प्रथम तेजपत्ता, जिरे, लाल मिरच्या, बारीक चिरलेले टोमॅटो घालून त्यात थोडे पाणी घालून शिजवतात. मग त्यात हळद, मीठ, जिर्याची पूड, आल्याची पेस्ट आणि थोडे तिखट घालतात. परत त्यात थोडे पाणी घालून सर्व तेल सुटेपर्यंत शिजवतात. ते सर्व शिजले की निथळून ठेवलेले डाळ तांदूळ घालायचे आणि तसेच मसाल्यात परतून ते सर्व मिश्रण कोरडे झाले आणि त्यात साधारण दुप्पट आधणाचे पाणी घालून शिजवतात.

पूर्वी प्रवासात लोक डाळ तांदळाचा शिधा घेऊन जायचे आणि विश्रामाच्या ठिकाणी कुठेही तीन विटांच्या चुलीवर खिचडी शिजवायचे. तशी खिचडी तर फारच सुंदर लागते. माझ्या काकांना कोणत्याही प्रवासात तसा शिधा घेऊन जायला फार आवडायचे. हल्ली वेट वॉचर्स आणि मधुमेही लोक डाळ तसेच मोड आणलेल्या बाजरी/ज्वारी आणि मुगाची डाळ यांची भाज्या घालून खिचडी करतात. ती खिचडी पण छानच लागते.

खरे तर खिचडी हा आळशी बायकांनी पकवण्याचा पदार्थ आहे, असे आपले उगीचंच म्हणायची पद्धत आहे. स्वैपाकाचा कंटाळा असणार्या बायका आठवड्यातून तीनदा खिचडी मांडतात, अशी आमची आजी सांगायची. कोणत्याही मंगल कार्यानंतर, दिवाळीनंतर किंवा घरी कोणाचे निधन झाले असेल तर त्यानंतर सव्वा महिना तरी खिचडी करत नाहीत, तशी आमच्याकडे पद्धत आहे. खरे तर खिचडीचे मुख्य घटक म्हणजे डाळ आणि तांदूळ तरीही तिची चव साध्या वरण भातापेक्षा खूपच वेगळी लागते. खिचडीत कार्बोहायड्रेटस् आणि प्रोटिन्स दोन्हीही असल्याने तिला पूर्णान्न म्हटले जाते, पण काही असले तरी खिचडी हे कंफर्ट तसेच पोट आणि मन शांतवण्याचे अन्न आहे, हे मात्र कोणालाही मान्य होईल.

हे पत्र, मुद्रक निखील जयप्रकाश माने यांनी मालक, प्रकाशक, संपादक अशोक व्यंकटराव चिंचोले यांचे करिता चेतन ऑफसेट प्रिंटर्स, १७ शिवाजी हौसिंग सोसायटी, पद्मानगर बार्शी रोड, लातूर येथे मुद्रित केले. हे पत्रक प्रकाशक अशोक व्यंकटराव चिंचोले यांनी दै. भूकंप कार्यालय, मनपा शॉपींग कॉम्पलेक्स गांधी चौक, लातूर, ता.जि. लातूर ४१३५१२(महा.) येथे प्रकाशीत केले. संपादक- अशोक व्यंकटराव चिंचोले ((:-२५१८२२) RNI NO. MAHMAR/2012/42770

लातूर
भूकंप
http://epaper.dainikbhukamp.com
LATUR BHUKAMP
शुक्रवार १८ जुलै २०२५


## बेवारसची ओळख पटेना



लातूरः- लातूर शहरातील महात्मा गांधी चौकात बेवारस स्थितीत एक इसम आढळून आला होता. त्याच्यावर शासकीय रुगणालयात उपचार चालू असताना निधन झाले. मात्र त्या मयताचे ओळख पटलेली नाही. तेंव्हा संबंधीतांनी गांधी चौक पोलीस ठाण्याची संपर्क साधण्याचे आवाहन पोलीसांच्या वतीने करण्यात आले आहे. सदर बातमीतील फोटोनुसार या अनोळखी इमसाचे वय अंदाजे वय ४५ असावे अंगाने सडपातळ, लांबट चहरा, रंग गोरा, फिकट गुलाबी रंगाचा शर्ट, काळ्या व लाल रंगाचे अप्पर, काळ्या रंगाची जरकीन, काळ्या रंगाची पॅन्ट, त्यावरुन निळ्या रंगाची जीन्स, डोक्यावर टक्कल, असा वर्णाचा इसम असून कोणाला ओळख पटल्यास गांधी चौक पोलीस ठाण्याची संपर्क साधावा असे आवाहन तपासी अमलदारांनी केले आहे.

## अवैध सावकारीबाबत तक्रारी दाखल करण्याचे आवाहन

लातूर :- जिल्ह्यातील अवैध सावकरीविरुद्ध प्राप्त तक्रारींवर सावकारांचे निबंधक तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था आणि सहाय्यक निबंधक सहकारी संस्था यांच्यामार्फत कार्यवाही केली जात आहे. वर्षभरात जिल्ह्यातील तालुकास्तरीय सहाय्यक निबंधक सहकारी संस्था यांच्याकडे ५५ तक्रारी प्राप्त झाल्या असून त्याबाबत तातडीने कार्यवाही सुरु करण्यात आली आहे.

अवैध सावकारीविरुद्ध कोणत्याही नागरिकाची तक्रार असल्यास त्यांनी संबंधित तालुकास्तरावर सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था यांच्या कार्यालयाकडे किंवा जिल्हास्तरावर जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, लातूर मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, तळमजला, जुने जिल्हाधिकारी कार्यालयाच्या बाजूला, छत्रपती शिवाजी महाराज चौक, लातूर या कार्यालयाकडे तक्रार सादर करावी. तक्रारींच्या अनुषंगाने तातडीने कार्यवाही करण्यात येईल, असे जिल्हा उपनिबंधक सहकरी संस्था एस.व्ही. बदनाळे यांनी कळविले आहे.

# राज्याचे सहकार मंत्री ना. बाबासाहेब पाटील, सभापती मंचकराव पाटील यांच्या पुढाकाराने अहमदपुरात उभारणार शेतकरी भवन

### २ कोटी ९०लक्ष ४९ हजार रुपयांच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता





अहमदपूर :- राज्याचे सहकार मंत्री तथा चाकूर - अहमदपूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार ना. बाबासाहेब पाटील यांना अहमदपूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती मंचकराव पाटील यांनी अहमदपूर येथे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात शेतकऱ्यांच्या सोयीसाठी शेतकरी भवन मंजूर करून द्यावे अशी आग्रही मागणी केली होती. या मागणीची दखल घेत राज्याचे सहकार मंत्री ना. बाबासाहेब पाटील यांनी राज्याचे पणन मंत्री ना. जयकुमार रावल यांच्याशी अहमदपूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती मंचकराव पाटील व सर्व संचालक मंडळांनी त्यांची भेट घेत अहमदपूर येथे शेतकरी भवन मंजूर करावे अशी आग्रही मागणी केली होती. या मागणीची दखल घेत आज राज्य सरकारने कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात शेतकरी भावनांसाठी ०२ कोटी ९० लक्ष ४९ हजार रुपयाची प्रशासकीय मान्यता प्रदान केली असल्याची माहिती राज्याचे सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील व कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती मंचकराव पाटील यांनी प्रसिद्धी माध्यमाद्वारे दिली आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की नामदार बाबासाहेब पाटील, सभापती मंचकराव पाटील एक स्वतः शेतकरी असल्याकारणाने शेतकऱ्यांच्या व्यथा व वेदना त्यांना माहित आहेत. तालुक्याच्या ठिकाणी शेतकरी विविध कामानिमित्त येतात, कृषी उत्पन्न बाजार समितीत सुद्धा मोठ्या प्रमाणात शेतकरी येत असतात. त्यांना या ठिकाणी थांबण्यासाठी कुठलीही एक महत्त्वाचे ठिकाण नसल्यामुळे शेतकऱ्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत होते. या गोष्टीची दखल घेत सभापती मंचकराव पाटील व संचालक मंडळांनी राज्याचे सहकार मंत्री ना. बाबासाहेब पाटील यांच्याकडे शेतकरी भवनाची आग्रही मागणी केली होती. नामदार पाटील यांनी राज्याचे पणन मंत्री जयकुमार रावल यांच्याकडे सभापती मंचकराव पाटील व सर्व संचालक मंडळाची बैठक घेऊन अहमदपूरला शेतकरी भवन तात्काळ मंजूर करावे अशी आग्रही मागणी केली. या मागणीची दखल घेत राज्य सरकारने येथे नव्याने कृषी उत्पन्न बाजार समिती अहमदपूर येथे शेतकरी भवन बांधण्यासाठी २ कोटी ९०लक्ष ४९ हजार रुपयांच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता मिळवून घेतली असून सर्व प्रशासकीय बाबी पूर्ण करून लवकरच या शेतकरी भवनाचे काम सुरू होईल अशी माहिती राज्याची सहकार मंत्री ना. बाबासाहेब पाटील, कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती मंचकराव पाटील यांनी दिली आहे. या शेतकरी भवनामुळे अहमदपूर तालुक्यातील शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात आधार मिळणार आहे. त्यामुळे अहमदपूर तालुक्यातील शेतकरी मोठ्या प्रमाणात आनंदी आहेत. तालुक्यातील शेतकऱ्यांनी नामदार बाबासाहेब पाटील, सभापती मंचकराव पाटील यांचे शेतकरी भवन च्या उभारणी बद्दल आभार मानले आहेत.

# सार्वजनिक आरोग्य सेवेतील उत्कृष्ट कामगिरीबद्दल पालकमंत्र्यांनी केले लातूर जिल्हा प्रशासनाचे अभिनंदन

### * दोन वर्षांत १९ आरोग्य संस्थांना मिळाले राष्ट्रीय गुणवत्ता हमी मानांकन
### * राज्यात प्रथमच ग्रामीण रुग्णालयाला एनक्यूएएस मानांकन

लातूर :- लातूर जिल्ह्यातील आरोग्य संस्थांनी गेल्या दोन वर्षांत कायाकल्प पुरस्कार आणि राष्ट्रीय गुणवत्ता हमी मानांकन (एनक्यूएएस) प्राप्त करून आपले नाव उज्वल केले आहे. विशेषतः राज्यात प्रथमच ग्रामीण रुग्णालय श्रेणीत मुरुड ग्रामीण रुग्णालयाने एनक्यूएएस मानांकन मिळवण्याची उल्लेखनीय कामगिरी केली आहे. या यशाबद्दल पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना यांच्यासह जिल्हा आरोग्य विभागातील सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले आहे.

सन २०२४ मध्ये जिल्ह्यातील ३ प्राथमिक आरोग्य केंद्रांना आणि ८ आरोग्यवर्धिनी उपकेंद्रांना राष्ट्रीय पातळीवरील आणि शासनाच्या आरोग्य विभागात सर्वोच्च समजले जाणारे राष्ट्रीय गुणवत्ता हमी मानांकन (एनक्यूएएस) मिळाले आहे. सन २०२५ मध्ये ८ आरोग्यवर्धिनी उपकेंद्रांना हे मानांकन प्राप्त प्राप्त झाले आहे. याशिवाय, ३० आरोग्यवर्धिनी उपकेंद्रांची राज्यस्तरीय मूल्यांकनासाठी निवड झाली आहे. या मानांकनासाठी निवड करताना आरोग्य केंद्रातील सेवा, रुग्णांचे हक्क, वैद्यकीय काळजी, संसर्ग नियंत्रण, गुणवत्ता व्यवस्थापन आणि परिणाम आदींच्या सार्वजनिक आरोग्य सुविधांच्या गुणवत्तेची पडताळणी केली जाते.

सन २०२४-२५ या वर्षात कायाकल्प पुरस्कारामध्येही लातूर जिल्ह्याने उत्कृष्ट कामगिरी केली आहे. भातांगळी येथील प्राथमिक आरोग्य केंद्राला २ लाख रुपयांचा प्रथम क्रमांकाचा पुरस्कार जाहीर झाला आहे. तसेच, ३८ प्राथमिक आरोग्य केंद्रांना प्रत्येकी ५० हजार रुपयांचे प्रोत्साहनपर पुरस्कार आणि तीन आरोग्यवर्धिनी उपकेंद्रांना १.८५ लाख रुपयांचे जिल्हास्तरीय पुरस्कार जाहीर झाले आहेत. याशिवाय, १४७ आरोग्यवर्धिनी उपकेंद्रांना प्रत्येकी २५ हजार रुपयांचे प्रोत्साहनपर पुरस्कार जाहीर झाले आहेत.

राष्ट्रीय गुणवत्ता हमी मानांकनामध्ये ग्रामीण रुग्णालय श्रेणीत राज्यात प्रथमच मुरुड ग्रामीण रुग्णालयाची निवड झाली आहे. तसेच, जिल्हा शल्यचिकित्सक स्तरावर लातूर स्त्री रुग्णालय, उदगीर सामान्य रुग्णालय, निलंगा उपजिल्हा रुग्णालय, मुरुड ग्रामीण रुग्णालय, अहमदपूर ग्रामीण रुग्णालय आणि रेणापूर ग्रामीण रुग्णालय यांना प्रत्येकी १ लाख रुपयांचे कायाकल्प प्रोत्साहनपर पुरस्कार जाहीर झाले आहेत. या यशामुळे लातूर जिल्ह्याची आरोग्य क्षेत्रातील कामगिरी उल्लेखनीय ठरली आहे. याबद्दल पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बालाजी शिंदे, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. प्रदीप ढेले यांच्यासह सर्व आरोग्य यंत्रणेचे अभिनंदन केले आहे.

जिल्ह्यातील आरोग्य संस्थांमधील सेवांच्या सुधारणांमध्ये लोकप्रतिनिधी, स्थानिक स्वराज्य संस्थांचे पदाधिकारी यांनीही योगदान देत अधिकारी, कर्मचाऱ्यांना वेळोवेळी प्रोत्साहन दिले.

नागरिकांना दर्जेदार आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासन प्रयत्नशील आहे. लातूर जिल्ह्यातील या प्रयत्नांची राष्ट्रीय पातळीवर दखल घेतली गेली ही जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब आहे. रुग्णांना उच्च दर्जाच्या आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी यापुढेही आरोग्य यंत्रणेला सर्वतोपरी सहाय्य पुरवले जाईल, असे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी सांगितले.

# अवैध वाळू उपसा करणारी बोट केली तेरणा-मांजरा संगमावर नष्ट

**महसूल प्रशासन आणि पोलीस प्रशासनाच्या संयुक्त कार्यवाहीत जवळपास तीन लाखांचा मुद्देमाल नष्ट करण्यात आला**



औराद शहाजानी :- निलंगा तालुक्यातील मौजे औराद शहाजानी व वांजरखेडा या सिमावर्ती भागात अवैध वाळुउपसा करण्यासाठी दोन बोट फिरत असल्याची गुप्त माहिती मिळताच महसूल शासनाचे मंडळ अधिकारी व दोन तलाठी यांचे टीम घटनास्थळी जाताच व एक बोट तेथील हजर लोकांनी चाहूल लागताच पळ काढण्यात यशस्वी झाले तर एक ताब्यात घेत बोट पोलीस प्रशासनाच्या मदतीने व शेतकऱ्यांच्या मदतीने महसूल प्रशासनाच्या आणि पोलीस प्रशासनाच्या संयुक्त कार्यवाहीत नष्ट करण्यात आली. दिनांक १७ जुलै रोजी सकाळी अंदाजे ११ वा. औराद शहाजानी व वांजरखेडा या सिमावर्ती भागात बोट फिरत असल्याची गुप्त माहिती मिळताच मंडळ अधिकारी भरत मुंडे व तलाठी लहाणे व तलाठी शुभम वाघमारे यांचे पथक सहाय्यक पोलीस निरीक्षक विठ्ठल दुरपडे यांचे मार्गदर्शनातील पोलीस प्रशासनाच्या मदतीने संयुक्त कारवाई करत एक बोट ताब्यात घेत तिला नष्ट करण्यात आले तर एक बोट ही प्रशासन येत असल्याची चाहूल लागताच पळुन कर्नाटक राज्यात गेली त्यामुळे महाराष्ट्र राज्यातील महसूल कर्मचारी व पोलीस कर्मचारी यांना दुसरी बोट पकडण्यात अपयश आले पण एक बोट पकडलेली त्या बोटीला नष्ट करून टाकण्यात आले.या संयुक्त कार्यवाहीत तहसीलदार प्रसाद कुलकर्णी यांचे मार्गदर्शनाखाली मंडळ अधिकारी मुंडे , तलाठी लहाणे , तलाठी शुभम वाघमारे तसेच सहाय्यक पोलीस निरीक्षक यांचे मार्गदर्शनाखाली शेख अली, जाधव जी.एम यांनी जबरदस्त कामगिरी बजावली.

# औषधांच्या पॅकिंगनुसार दर्शविण्यात आलेल्या घटकांच्या तपासणीसाठी समिती स्थापन

मुंबई : औषध विक्रेते आणि औषध विक्रेते कंपन्यामार्फत पॅकिंगवर दर्शविण्यात आलेल्या घटकांची तपासणी करण्यासाठी उच्चस्तरीय समितीची स्थापना करण्यात आली असून ही समिती औषधांतील घटकांची तपासणी करेल. अन्न व औषध प्रशासन सचिवांच्या अध्यक्षतेखाली नेमल्या जाणा-या या समितीच्या अहवालानंतर दोषी आढळलेल्या संबंधितांवर आवश्यक ती कारवाई केली जाईल, अशी माहिती अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी विधान परिषदेत दिली.

विधान परिषद विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे यांनी यासंदर्भात लक्षवेधीद्वारे प्रश्न विचारला असता, मंत्री झिरवाळ यांनी उत्तर दिले. यात सदस्य अरूण लाड, सदाशिव खोत यांनीही सहभाग घेतला.

यावर मंत्री झिरवाळ म्हणाले की, नोव्हेंबर २०२२ ते ऑक्टोबर २०२४ दरम्यान राज्यातील शासकीय व निमशासकीय रुग्णालयांमधून ९७९ औषध नमुने तपासणीसाठी घेण्यात आले होते.

यापैकी ११ नमुन्यांमध्ये औषधांचा मूळ घटक नसल्याचे स्पष्ट झाले. या नमुन्यांची माहिती तज्ज्ञांच्या अहवालात नमूद झाली होती. संबंधित औषध पुरवणाऱ्या ११ कंपन्यांचा बनावट औषध वितरणात सहभाग असल्याचे निष्पन्न झाल्यानंतर त्यांचे विक्रेत्यांचे परवाने रद्द करण्यात आले आहेत.

या प्रकरणात सात आरोपींची नावे समोर आली असून, त्यापैकी दोघांना न्यायालयाने अटकपूर्व जामीन मंजूर केला आहे, तर चार जण सध्या कोठडीत असून उर्वरित आरोपींचा शोध सुरू आहे. पोलीस तपासात ही औषधे आंबेजोगाई येथे आढळून आली असली तरी, त्याचे जाळे ठाणे, भिवंडी, लातूर आणि नांदेडपर्यंत पसरले असल्याचेही मंत्री झिरवाळ यांनी स्पष्ट केले. तपासात उघडकीस आलेल्या काही बनावट औषध वितरक कंपन्यांची नावेही मंत्री झिरवाळ यांनी सांगितली. यामध्ये विशाल इंटरप्राइजेस (कोल्हापूर), मे जया इंटरप्राइजेस (लातूर), बायोटेक (भिवंडी, ठाणे) यांचा समावेश असून, यांचे परवाने रद्द करण्यात आले आहेत. भविष्यात असे प्रकार निदर्शनास आल्यास तात्काळ कारवाई केली जाईल, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

# दयानंद वाणिज्य महाविद्यालयात आरोग्य तपासणी शिबीर संपन्न




लातूर : येथील दयानंद वाणिज्य महाविद्यालयातील राष्ट्रीय छात्र सेना विभाग आणि डॉ.लाल पॅथलॅब लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने दि.१६ आणि १७ जुलै-२०२५ रोजी आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सदरील शिबिराचे उदघाटन प्राचार्य डॉ.प्रशांत मान्नीकर यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी उपप्राचार्य डॉ.गणेश लहाने, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष समन्वयक डॉ.बाळासाहेब चव्हाण, वाणिज्य विभाग प्रमुख डॉ.मनीषा आष्टेकर, राष्ट्रीय छात्र सेना विभागाचे असोसिएट एन.सी.सी. ऑफिसर लेफ्टनंट डॉ.साईनाथ उमाटे, डॉ. माधवी कुलकर्णी, डॉ.लाल पॅथलॅबचे जिल्हा समन्वयक इरफान सय्यद, रक्तसंग्रहक आवेज रजा, सलीम शेख आदींची प्रमुख उपस्थिती होती.

शिबिराचे उदघाटन करताना प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर म्हणाले की, आजच्या धकाधकीच्या जीवनामध्ये आरोग्याची हेळसांड होत आहे, कोणीही आरोग्याकडे लक्ष देत नाही. विशेषता महिलांमध्ये हिमोग्लोबिन, कॅल्शियम, लोह यांची कमतरता भासते.या पार्श्र्वभूमीवर राबवित असलेला राष्ट्रीय छात्र सेना विभागाचा आरोग्य तपासणी उपक्रम स्वागतार्ह आहे.या आरोग्य तपासणी शिबिरात अधिकाधिक विद्यार्थी, प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी यांनी सहभागी होण्यासाठी आवाहन त्यांनी केले. शिबिरादरम्यान हिमोग्लोबिन कॅल्शियम, लोह, शुगर, कॉलेस्ट्रॉल, थायरॉईड, युरिक ऍसिड, ब्लड ग्रुप, लिपिड प्रोफाइल, फिव्हर पॅनल,लिव्हर पॅनल, व्हिटॅमिन बी, व्हिटॅमिन डी आदींची आरोग्य तपासणी करण्यात आली.सदरील शिबिरात उल्लेखनीय बाब म्हणजे सदरील शिबिरात राष्ट्रीय छात्र सेना विभागाचे सर्व कॅडेट, विद्यार्थी, माजी विद्यार्थी, प्राध्यापक व प्रशासकीय कर्मचारी असा तब्बल १३१ जणांनी आपली आरोग्य तपासणी करून घेतली

## टी. सी. हरवली आहे

शाहू गंगाधर बादलगे व महादेवी गंगाधर बादलगे या नावाच्या जिल्हा परिषद शाळा, देगाव ता. देगलूर जि. नांदेड येथून इयत्ता २ री पास झाल्याच्या दोन वेगवेगळ्या एकत्रित ठेवलेल्या टी. सी. मुखेड ते लातूर प्रवासादरम्यान हरवल्या आहेत. तरी सदर टी. सी. कोणास सापडल्यास खालील मोबाईल क्रमांकावर संपर्क करावा.

-: संपर्क :-
मो. क्र. - ९८५०९३६५००

## CHANGE IN NAME

I HAVE CHANGE MY NAME FROM **SHAIKH SHAHEJADEBEE MOHAMMAD HUSSAINSAB TO SHAHJANBI HUSENSAB SHAIKH** HENCE FROTH THIS DECLERATION USE **SHAHJANBI HUSENSAB SHAIKH** IN FUTURE THE SAME NAME WILL BE USED BY MY WIFE, CHILDREN AND FAMILY.

**OLD NAME : SHAIKH SHAHEJADEBEE MOHAMMAD HUSSAINSAB**
**NEW NAME : SHAHJANBI HUSENSAB SHAIKH**
**Address : - SHAHWALI ROAD, NEAR MASJIDE SOLEHIN SALE GALLI LATUR (M.S.) 413512**

## CHANGE IN NAME

I have changed my name from **SULTANA BEGUM AB SATTAR SHAIKH** to **SULTANA ABDUL SATTAR SHAIKH** Hence for this declaration. And in future I will use my new name **SULTANA ABDUL SATTAR SHAIKH** Also, in future the same name will be used by my family.

**Old Name : SULTANA BEGUM AB SATTAR SHAIKH**
**New Name : SULTANA ABDUL SATTAR SHAIKH**
**Address : OPP KAMLA NEHRU SCHOOL, KHORI GALLI, LATUR - 413 512, MAHARASHTRA, INDIA.**

## CHANGE IN NAME

I HAVE CHANGE MY NAME FROM **KAILAS TO BANDGAR KAILAS TUKARAM** HENCE FROTH THIS DECLERATION USE **BANDGAR KAILAS TUKARAM** IN FUTURE THE SAME NAME WILL BE USED BY MY WIFE, CHILDREN AND FAMILY.

**OLD NAME : KAILAS**
**NEW NAME : BANDGAR KAILAS TUKARAM**
**Address : - Flat No. 04, Shreyash Apartment, Latur (M.S.) 413512**

# हरंगुळ बु. येथे सोमवारी विविध देवतांच्या मूर्तींची प्राणप्रतिष्ठापना

लातूर : शिवशक्ती प्रतिष्ठाण हरंगुळ (बु) द्वारा नगरीमध्ये सोमवार, दि.२१ जुलै,२०२५ रोजी गुरुवर्यांच्या शुभहस्ते श्रीगणेशा, श्री विरभद्रेश्र्वर, श्री भद्रकाली, श्री दत्त नर्मदेश्र्वर, श्री ललितात्रिपुरसुंदरी, श्री.पंचमुखी हनुमान, श्री.शनिदेव, श्री.नागेश्र्वर,श्री रेणुकाचार्य, श्री मन्मथस्वामी आणि श्री नंदी यांची विधिवत प्राणप्रतिष्ठापना सोहळा शिवशक्ती धाम, श्री विरभद्रेश्र्वर मंदिर, लॉर्ड श्रीकृष्ण इंग्लीश स्कुलच्या समोर, हरंगुळ बु. येथे आयोजित केला आहे. सकाळी ८ वाजता पूजा, सकाळी ९ वाजून १५ मिनिटांनी प्राणप्रतिष्ठापना, रुद्रयाग पुजा, सकाळी ११ वाजता धर्मसभा व गुरुवर्यांचे प्रवचन होऊन त्यानंतर भाविकांसाठी महाप्रसाद आयोजित करण्यात आला आहे. तत्पूर्वी रविवार २० रोजी सकाळी ११ वाजता मंडल पूजा व धान्यादिवास पुजेस सुरुवात दुपारी ३ वाजता जलादिवास पुजन, रात्री ९ वाजता शय्यादिवस पूजन होईल. या सोहळयासाठी विशेष सेवा, कार्यक्रम समिती, सेवा समिती, मिरवणूक समिती , महाप्रसाद समिती विधिवत पूजेसाठी वैदिक मंडळ सज्ज झाले आहे. या सोहळयास खासदार डॉ. शिवाजी काळगे, उमरग्याचे आमदार प्रविण स्वामी, अजित पाटील कव्हेकर, अर्चनाताई पाटील चाकूरकर, नगरसेवक शैलेश स्वामी, हरंगुळ नगरीचे सरपंच शितलताई भिमाशंकर झुंजारे यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे. कार्यक्रमामध्ये सर्व भाविक-भक्तांनी सहभागी होण्याचे आवाहन वेदशा.प्रा.रमेश रामलिंग स्वामी व गावकऱ्यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी वेदशा.प्रा.रमेश रामलिंग स्वामी ९७६७३९७८७७ यांच्याशी संपर्क साधावा.


SINCE 1972
माळवदकर एजन्सीज
सावेवाडी, लातूर
mo. 9422656522
सर्व प्रकारच्या फर्निचरचे उत्पादक व विक्रेते

श्री.तिरूपती
ट्रेडींग कंपनी
शिवाजी चौक, निलंगा, जि. लातूर
जैन ठिबक सिंचन
जैन स्प्रिंकलर
जैन पी.व्ही.सी.पाईपचे
-: अधिकृत विक्रेते:-
प्रो. गुणवंत गायकवाड हलगरकर
फोन:-दु. २४२४६३,
मो.९४०४६८२९९९